मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■

नवे विचार...नवी सुरुवात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १३५ ■ सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करू

## उपमुख्यमंत्री अजित पवार ; आढावा बैठकीत निर्देश ■ ॲग्री हॅकेथॉनसाठी सांगलीने पुढाकार घ्यावा

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली जिल्हा हा नेतृत्त्व करण्यास संधी देणारा जिल्हा आहे. या जिल्ह्याने अनेक मान्यवरांना नेतृत्त्व करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या एकंदरीत आजपर्यंतच्या कामकाजात या जिल्ह्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

येथील लोकप्रतिनिधींनी विकासाच्या बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन ठेवला आहे. त्यांना प्रशासनाने चांगली साथ दिली आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी राज्य शासन स्तरावर आवश्यक ते सहकार्य सर्वतोपरी करू, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिली.

सांगली जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांच्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस खासदार विशाल पाटील, आमदार सदाभाऊ खोत, इद्रिस नायकवडी, डॉ. सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ आणि सत्यजीत देशमुख तसेच जिल्हाधिकारी अशोक काकडे, तृप्ती धोडमिसे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



ॲग्री हॅकेथॉन भरवण्यासाठी सांगली जिल्ह्याने पुढाकार घ्यावा. त्याचा फळ उत्पादक व अन्य शेतकऱ्यांना लाभ होईल, असे सूचित करून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, सांगली जिल्ह्यातून द्राक्ष, डाळिंब, केळी निर्यात मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्या अनुषंगाने द्राक्ष निर्यातीसाठी रेसिड्यू लॅबसाठी कृषि विभागाने आवश्यक कार्यवाही करावी. तसेच, कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधी यशस्वी प्रयोग झाले आहेत. पाणी, खत बचत आणि जास्त टनेज यासाठी एआयचा चांगला उपयोग होतो. सांगली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखानदारांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करावा. त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी काम करावे, असे त्यांनी सूचित केले.

या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य शासनाशी संबंधित प्रश्नांची नोंद घेऊन, ते मार्गी लावण्यासाठी आवश्यक तेथे उच्चस्तरअधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे तात्काळ संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्याचे सूचित केले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी सांगली जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती, कृषि सिंचन व उत्पादन, औद्योगिक व आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, प्रलंबित कामे व अपेक्षा, पर्यटन, पूरनियंत्रण, आरोग्य, विद्युत, सौर प्रकल्प, रोजगार निर्मिती, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, सांगली जिल्ह्यातील लोकांच्या प्रमुख अपेक्षा, अडचणींवर मात करण्याच्या उपाययोजना आदिंबाबत सविस्तर सादरीकरण केले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते रोपट्यास जलअर्पण करण्यात आले. बैठकीस जिल्ह्यातील सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

## संक्षिप्त...

### बांधकाम करताना इमारतीवरुन पडून गवंडी ठार

**सांगली : हॅलो प्रभात**



धामणी रस्त्यावरील इमारतीचे बांधकाम सुरू असताना उंचावरून पडून रमण प्रकाश पवार (वय ३५) हा गवंडी जागीच ठार झाला. मंगळवारी रात्रीच्या सुमारास अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. बांधकामाच्या ठिकाणी योग्य प्रकारे सुरक्षेची खबरदारी घेतली नसल्यामुळे कंत्राटदार व मुकादम यांचा निष्काळजीपणामुळे रमण हा इमारतीवरून पडून ठार झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महाबळेश्वरात पुन्हा मुसळधार

**महाबळेश्वर : हॅलो प्रभात**

पंधरा दिवसांनंतर महाबळेश्वरात पावसाचे दमदार पुनरागमन झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून पावसाने चांगलाच जोर धरला असून सकाळी ८.३० पर्यंतच्या चोवीस तासांमध्ये १४३.८ मि.मी. ५.६६ इंच पावसाची नोंद झाली. दिवसभर पावसाची धुवाँधार बॅटिंग सुरूच होती. या पावसात पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद लुटला.

### औद्योगिक वसाहतीत सिलिंडरचा स्फोट

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील औद्योगिक वसाहतीत अनिष्का इंडस्ट्रीज या कारखान्यात शनिवारी सकाळी एलपीजी गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. सुदैवाने कामगार महिला बाहेर पळाल्याने जीवितहानी टळली. स्फोटाने अर्धा किलोमीटर परिसर हादरला. कारखान्यावरील पत्रे उडाले.

### इतिहासाची साक्ष देणारा रेल्वे पूल होणार जमीनदोस्त

**सोलापूर : हॅलो प्रभात**

उद्योग विश्वात सोलापूरचे नाव आघाडीवर असताना, १९२२ मध्ये मंगळवेढ्यावरून पंढरपूर, कोल्हापूरसह अन्य शहरांना जोडण्यासाठी येथील भैय्या चौकातील रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्यात आला होता. हा पूल शहराच्या विकासाचा साक्षीदार आहे. त्या पुलास शंभर वर्षे पूर्ण झाले असून, हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनल्याने प्रशासनाकडून हा पूल लवकरच जमीनदोस्त केला जाणार आहे.

### कांदा उत्पादकांना अनुदान

**नाशिक : हॅलो प्रभात**

नाशिक जिल्ह्यातील नऊ हजार ९८८ कांदा शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले असून, त्यासाठी शासनाने १८ कोटी ५८ लाख रुपयांचे वितरण केले आहे. शासनाने १४ हजार ६६१ शेतकऱ्यांना कांदा अनुदानापोटी २८.३२ कोटींचा निधी वितरीत केला आहे.

## काँग्रेस कार्यालय टिळकभवनमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**मुंबई : हॅलो प्रभात**

प्रचंड मोठा संघर्ष व हजारो लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानानंतर देशाला स्वांतत्र्य मिळाले असून काँग्रेसचे नेतृत्व व कर्तृत्व याचे त्यात मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यासाठी जेव्हा देश लढत होता त्यावेळी जे लोक ब्रिटिशांसोबत होते, पेन्शन घेत होते व ज्या लोकांचा या लढ्यात काहीही सहभाग नव्हता ती शक्ती आज सत्तेवर आहे. लाल किल्ल्यावरून देशाचे पंतप्रधान जे बोलत त्या प्रमाणे वागत होते पण त्याला मागील ११ वर्षात याला बगल देऊन फक्त खोटे बोलले जात आहे. रा. स्व. संघाबद्दल पंतप्रधान आज जे बोलले तेही खोटेच बोलले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.



टिळक भवन येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, सेवादल व काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. सुरुवातीला काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी स्वांतत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिला. ते पुढे म्हणाले की, भारताची फाळणी ही एक दुःखद घटना आहे. पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल होते म्हणून देश एकसंध राहिला नाहीतर ६०० देश झाले असते. फाळणीचे दुःख आहेच पण भाजपा सरकार १३ ऑगस्टला मंत्रालय रात्रभर उघडे ठेवून फाळणीचा दिवस साजरा करण्याचा फतवा काढते, हा काय प्रकार आहे. १९४२ चे चले जाव आंदोलन सुरु होते तेव्हा रा. स्व. संघ, सावरकर कोठे होते, हे पंतप्रधानांनी सांगायला पाहिजे होते. बेशिस्त वाढली आहे आणि ती काँग्रेसच दूर करु शकते. देशाचा व काँग्रेसचा डीएनए एकच आहे असेही सपकाळ म्हणाले.

## क्रॉस बॉर्डर ग्लोबल प्रोग्राममध्ये 'डी.वाय. पाटील'च्या १५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापुरातील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि मलेशियाच्या युनिव्हर्सिटी केबांगसान मलेशिया (यूकेएम) यांच्यात ऐतिहासिक शैक्षणिक करार झाला आहे. याअंतर्गत महाविद्यालयातील १५ विद्यार्थी आणि एक प्राध्यापक येत्या ८ ते १५ सप्टेंबर २०२५ दरम्यान मलेशियात होणाऱ्या 'क्रॉस बॉर्डर ग्लोबल इंजिनिअरिंग प्रोग्राम'मध्ये सहभागी होणार आहेत.

यूकेएमचे अधिष्ठाता प्रा. डॉ. मोहम्मद स्युहामी अब रहमान आणि डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता यांच्या स्वाक्षऱ्यांनी हा करार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण, संस्थात्मक सहकार्य आणि जागतिक पातळीवरील अनुभव उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या सहकार्यातून संयुक्त संशोधन, विद्यार्थी-प्राध्यापक देवाणघेवाण आणि जागतिक आव्हानांसाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास गती मिळणार आहे.



या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना चीन, जपान, तैवान आणि मलेशिया येथील समवयस्कांसह काम करण्याची संधी मिळणार आहे. इंडस्ट्री ४.०, आयओटी ऑटोमेशनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. यूकेएमच्या 'पेमरकासान कॉम्पेटेन्सी अकॅडेमिक सिस्वा' या संशोधन गटासोबत हेल्थकेअर, शिक्षण, उद्योग सुरक्षा आणि उत्पादकता वाढीसाठी नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर काम करण्यावर भर दिला जात आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांचे मार्गदर्शन तर प्राचार्य प्रा. एस. डी. चेडे आणि रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे यांचे सहकार्य लाभले. आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे डॉ. सनी मोहिते आणि डॉ. कीर्ती महाजन यांनी समन्वय साधला.

## १० एम.व्ही.ए.पॉवर ट्रान्सफॉर्मरचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**सांगली : हॅलो प्रभात**

मिरज तालुक्यात ३३/११ के.व्ही. कानडवाडी उपकेंद्र येथील १० एम.व्ही.ए. पॉवर ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार डॉ. सुरेश खाडे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कं. लि. च्या स्वतंत्र संचालिका नीता केळकर, एमएसईबी कोल्हापूर परिमंडळाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, सांगली मंडळाचे अधीक्षक अभियंता अमित बोकील, सांगली ग्रामीणचे कार्यकारी अभियंता सुरेश सवाईराम, सांगली शहर विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता, महाराष्ट्र चेम्बर ऑफ कॉमर्सचे संचालक रमेश आरवाडे, शेखर इनामदार आदि उपस्थित होते.



संचालिका नीता केळकर यांनी वैयक्तिक लक्ष घालून त्वरित मुख्य कार्यालय मुंबई येथून मंजुरी घेऊन २००.०४ लक्ष इतका निधी त्वरित उपलब्ध करून दिला. यामुळे कानडवाडी उपकेंद्रामधील एका पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता ५ एम.व्ही.ए. वरून १० एम.व्ही.ए. करण्यात आली.

## डी.वाय.पाटील एज्युकेशनल सिटीत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तळसंदे : हॅलो प्रभात**

डी. वाय. पाटील एज्युकेशनल सिटी तळसंदे येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डी. वाय. पाटीलग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी कॅम्पस डायरेक्टर डॉ. एस. बी. पाटील, डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. आर. एस पावसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. ए. के. गुप्ता यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रगीत झाले. यावेळी डॉ. गुप्ता यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. जे. ए. खोत, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एन. शेलार, पी. एस. पाटील, हेड फार्म ऑपरेशन्स ए. बी. गाताडे, कृषी विज्ञान केंद्र प्रमुख जयवंत जगताप, यांच्यासह विविध महाविद्यालयांचे उपप्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुढील आठवड्यात उरुण-ईश्वरपुर असा आदेश निघणार : अजित पवार

**ईश्वरपुर : हॅलो प्रभात**

ईश्वरपुर शहराचे नामकरण उरुण- ईश्वरपुर असे व्हावे यासाठी दि.०१ऑगस्ट पासुन साखळी उपोषण सुरु आहे,या उपोषण स्थळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी भेट दिली. ईश्वरपुर शहराचे उरुण-ईश्वरपुर असे नामकरणाचा शासन आदेश पुढील आठवड्यात काढणार असल्याचा शब्द उपोषणकर्तांना व शहरवासियांना दिल्याने उरुण व शहरात समाधानाचे वातावरण पसरले.



यावेळी अजित पवार म्हणाले, ईश्वरपुर शहराचे नामकरण उरुण- ईश्वरपुर व्हावे ही रास्त मागणी असुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना.चंद्रकांत पाटील यांनी या निर्णयाबाबत सकारात्मक विचार केला आहे, पुढील आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मी स्वत: ना.चंद्रकांत पाटील व महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे मंत्रालयात एकत्रीत बसुन उरुण ईश्वरपुर असा नामकरणाचा आदेश काढला जाईल, उरुण या शहराची ओळख आहे, ती कायम राहील याची काळजी करु नका.

यावेळी उरुण ईश्वरपुर नगरपरीषदेचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष व राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले- पाटील, माजी उपनगराध्यक्ष जयवंत पाटील, संजय कोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील जनतेने उद्धव ठाकरेंना घरी बसवेल

### नवनाथ बन ; संजय राऊत यांना जोरदार प्रत्युत्तर

**मुंबई : हॅलो प्रभात**

उबाठा गटाच्या ५२ पत्त्यांच्या कॅटमधील सर्वच पत्ते जोकरचे आहेत. त्यामुळे संजय राऊत यांनी महाजोकराची भाषा करू नये. तुमचे मालक उद्धव ठाकरे विधानसभा निवडणुकीवेळी म्हणाले होते 'एकतर तू राहशील किंवा मी राहीन'. मात्र जनतेने उद्धव ठाकरे यांना महाजोकर करून घरी बसवले आणि देवेंद्र फडणवीस जनतेच्या आशीर्वादाने मुख्यमंत्री झाले. ही वस्तुस्थिती माकडछाप संजय राऊत यांनी ध्यानात घ्यावी, अशा शब्दांत भाजपा महाराष्ट्रचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी संजय राऊत यांना जोरदार प्रत्युत्तर दिले.

श्री. बन यांनी म्हटले आहे की, देवेंद्र फडणवीस हे विकासाचे थर लावत आहेत आणि भ्रष्टाचाराची हंडी फोडत आहेत. त्यामुळेच तुम्हाला झळ बसत आहे.

येणाऱ्या महापालिका निवडणुकीत खरा महाजोकर तुम्ही आणि तुमचा गटच आहे, हे मुंबईकर आणि मराठी माणूस दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही.

मुंबईतील भ्रष्टाचाराच्या आरोपांवर श्री. बन म्हणाले की, उद्धव ठाकरे हे लुटारूंचे सरदार आहेत, त्यामुळे संजय राऊत यांनी कमिशनच्या बाता मारू नयेत.

मातोश्री - २ कुणाच्या कमिशनवर उभी राहिली, याचं उत्तर आधी द्या. मृतावरच्या टाळुवरील लोणी खाणारे जर कोणी असतील तर ते स्वतः संजय राऊत आहेत. राऊतांच्या २०२९ च्या कोकणातील भविष्यवाणीस उत्तर देताना नवनाथ बन म्हणाले, २०२४ च्याच विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेने तुम्हाला शिमगा करायला भाग पाडले. तुमच्या गटाला दोन्ही हातांनी बोंबा माराव्या लागल्या आणि जनता तुम्हाला घरी बसवून आली.

२०२९ ची वाट पाहू नका, येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीतच मुंबईकर तुमच्या बडबडीला कंटाळून तुमच्या तोंडाला बुच लावतील.






# ‘हे’ मुक्या पशुपक्षांनी, प्राण्यांनी का भोगावे?

आज देशात वाढते प्रदुषण,शहरीकरण,औद्योगिकीकरण, वृक्षांची कत्तल आणि मोठमोठे टॉवर यामुळे स्थल,जल, वायूचे वातावरण दुषित झाले आहे यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक वृक्ष,पशुपक्षी लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.परंतु मानव बुध्दीजीवी प्राणी असल्यामुळे मुक्या प्राण्यांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा अन्याय होणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे व योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.अन्यथा मुक्या प्राण्यांमध्ये व आपल्यामध्ये काहीच फरक रहाणार नाही.आज राज्यासह संपूर्ण देशात मानवांच्या सुखसुविधांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू असुन देशातील अनेक भागांत शहरीकरण,औद्योगिकरण,परमाणु परिक्षण व रस्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामुळेच मोठ्या प्रमाणात जंगलसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत आणि हा प्रकार फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगात सुरू आहे.परंतु याचे प्रायश्चित्त आज मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागत आहे.देशात दिवसेंदिवस लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि लावारीस कुत्र्यांची संख्या वाढण्यामागे स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.कारण स्थानिक प्रशासनांना माहीत असते की कुत्रा चावला तर त्याचा काय परिणाम होतो तरी स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असते त्यामुळेच आज भारतात लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.एका आकडेवारी नुसार असे सांगण्यात येते की देशात दररोज १० हजार नागरिकांना कुत्रे चावा घेतात व यात अनेकांना रेबीज आजार होतो किंवा अनेकांचा मृत्यू सुध्दा होतो.यावरून आपण समजू शकतो की स्थानिक प्रशासनाच्या चुकांमुळे हा भयंकर प्रकार होत.स्थानिक प्रशासनाने वेळीच लावारीस कुत्र्यांवर आळा घातला किंवा नसबंदी केली असती तर अनेकांचा जीव वाचला असता किंवा चाव्यांचे प्रकार टाळता आले असते.त्यामुळे आता आदेश, निर्देश खूप झाले आता अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत कबुतरांना खाद्यबंदीचा वाद जोरदार उफाळल्याचे दिसून येते आणि हा मुद्दा आता मुंबई महापालिका,सरकार आणि हायकोर्ट अशा पध्दतीने सुरू आहे.महत्वाचा मुद्दा असा की कबुतरांना खाद्यबंदीचा का करावी? आपण संपूर्ण जंगल संपुष्टात आणले कबुतर हा तर छोटासा पक्षी आहे.आज जंगलतोडीमुळे वाघ,बंदर, बिबट्या,अस्वल इत्यादी अनेक हिंसक पशु शहरात व गावात सरळ प्रवेश करीत आहेत व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.बंदरांचा विचार केला तर जनु काय त्यांच्यासाठी जंगल संपुष्टात आले की काय असे त्यांना वाटत आहे.त्यामुळे आज देशातील अनेक शहरांत किंवा गावांमध्ये बंदर मोठ्या प्रमाणात दिसून येतात व मोठ्या प्रमाणात नुकसान सुध्दा करतात.परंतु याला कारणीभूत कोण?याचा विचार सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन का करीत नाही?

म्हणजे आपणच त्यांच्यावर अत्याचार व अन्याय करायचा आणि आपण त्यांच्या पासून नुकसानीचा धडा सर्वसामान्यांना शिकवायचा ही बाब कितपत योग्य म्हणावी! कबुतरांच्या बाबतीत वाढता रोष पहाता कबुतरखाना बंद करण्याच्या भुमिकेत असलेल्या मुंबई महापालिकेने मवाळपणा दाखवित सकाळी ६ ते ८ या दोन तासांच्या काळात कबुतरांना खाद्य टाकण्याची परवानगी देण्याच्या विचारात असल्याची माहिती मुंबई उच्च न्यायालयाला १३ ऑगस्टला दिली.माझ्या माहितीनुसार मुंबई महापालिका किंवा राज्य सरकार मुक्या पक्षांवर (कबुतरांवर) एकाकी त्यांच्या खाण्यावर बंदी घालु शकत नाही.कारण कबुतरांसारख्या अनेक जंगली पक्षांना शहरात आणण्यास स्वतः सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन जबाबदार आहे. त्यामुळे कबुतर असो व अन्य प्राणी त्यांच्या खाण्यापीण्याची व्यवस्था सरकारने प्रथम करावी नंतर सर्वसामान्यांना सांगावे की त्यांना खाद्य टाकावे किंवा नाही. गुन्हा सरकारने व प्रशासनाने करावा आणि त्याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा! असे सांगितले जाते की कबुतरांमुळे ६० प्रकारचे आजार होऊ शकतात त्यात मुख्यत्वे करून अस्थमा सारख्या आजारांचा समावेश आहे.ही बाब ठीक याचे आम्हीपण समर्थ करतो.परंतु शहरात कबुतरांचा एवढा लोंढा कसा काय आला यांचाही विचार सरकारने केला पाहिजे.सरकारने अशा प्राण्यांची व्यवस्था ताबडतोब गोशाळेत केली पाहिजे.त्याचप्रमाणे कबुतर,बंदर किंवा अन्य जंगलातील पशुपक्षी शहरात किंवा गावात का येत आहे याचाही गांभीर्याने विचार करून ताबडतोब जंगलतोड थांबविली पाहिजे व वाढते शहरीकरण रोखले पाहिजे.

# शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका

## १७ ऑगस्ट १६६६ : एक थरारक पलायन...


**छत्रपती शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका ही मराठ्यांच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाची ऐतिहासिक घटना आहे. पाश्चात्य दिनदर्शिकेनुसार १७ ऑगस्ट १६६६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज हे युवराज संभाजी महाराजांसह आग्र्याच्या किल्ल्यातून औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन यशस्वीरित्या पसार झाले. परंतु, त्यासाठी आधी अनेक महिने योजना आखली होती.**


स्वराज्याची उभारणी करत असताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनात अनेक संकटे आली. काही संकटे अशी होती की महाराज यातून सुखरूप बाहेर पडतील की नाही याबद्दल खूप मोठी शंका त्यावेळी महाराष्ट्रात निर्माण झाली होती. अफजलखान प्रसंग, जयसिंगाची स्वारी अशी अनेक संकटे महाराजांवर कोसळली. परंतु या सर्व संकटामध्ये सर्वात मोठे संकट म्हणजे आग्र्याची कैद. औरंगजेबासारखा दगेखोर बादशहा, कडेकोट पहारा आणि सर्वत्र निराशेचा अंधार, आशेचा एकही किरण महाराजांसमोर नाही. अशी मोठी बिकट अवस्था महाराजांची आग्रा भेटीत झाली होती. या औरंगजेब बादशहाचा कपटी व दगेखोर स्वभाव त्यांना माहीत होता. कारण शिवाजीराजे अत्यंत मुत्सद्दी, माणसांची पारख असणारे, दूरदृष्टी व राजकीय जाण असणारे होते. परंतु पुरंदरच्या तहाने महाराज कोंड्यात अडकले होते.

शिवाजी महाराजांना नजरकैदेत टाकले गेले. त्यावेळी ते अशा कोंड्यात अडकले होते की, प्रत्यक्षात मृत्यू डोल्यासमोर उभा होता. तो कधी? केंव्हा? कसा? काहीच ठावूक नव्हते. मशिवाजी महाराज यांना मारू नये, तसे केल्यास इकडे परिस्थिती हाताबाहेर जाईल, परंतु, इकडे देखील येऊ देऊ नयेफ असे पत्र दख्खनेतून जयसिंगने औरंगजेबाला पाठवले होते. त्यानंतर औरंगजेब याने महाराजांना काबुल मोहिमेवर पाठवायचे ठरवले. परंतु, महाराजांनी बादशहाची कुठलीच गोष्ट मानायला साफ नकार दिला. परिस्थिती अधिक बिकट होत होती. कुठल्याही क्षणी आपला मृत्यू समोर येईल हे महारांना ठावूक होते. परंतु, या कोंड्यातून बाहेर पडण्यासाठी महाराज कोणती शक्कल लढवता येईल या विचारात होते. अखेरे महाराजांना एक युक्ती सुचली. त्यानुसार त्यांनी एक योजना आखली. परंतु, ही योजना अशी होती की, जर यशस्वी झाली तर महाराजांची सुखरूप सुटका होणार होती. परंतु, जर योजना फसली असती तर थेट औरंगजेबच्या हातीच लागणार होते.

महाराजांबद्दल आग्र्याच्या बाजारात त्यावेळी अनेक अफवा पसरत होत्या. खुद्द जसवंतसिंग औरंगजेबाला सांगत होता कील शिवाजी महाराजांकडे दैवी शक्ती आहे. ते १४ ते १५ हात लांब उडी मारू शकतात. एका झटक्यात ४० ते ५० कोस अंतर ते चालून जाऊ शकतात. या अफवांमुळे बादशाहने स्वतःभोवतीची सुरक्षा अधिक वाढवली. शिवाजी महाराज यांच्यासोबत असलेले संभाजीराजे मात्र नजर कैदेत नव्हते. त्यांना फिरायला मुभा होती. त्यांच्या सोबत सर्जेराव जेधे आग्र्याबद्दल इत्यंभूत माहिती काढत. शिवाजी महाराज यांनी ठरवल्यानुसार योजना हळूहळू पुढे सरकत होती. ७ जून रोजी राजांनी सोबत असलेल्या सर्व सेवक आणि सैन्याला परत दख्खनेत पाठवून दिले. सोबत होते फक्त संभाजीराजे, हिरोजी फर्जंद, सर्जेराव, रघुनाथ बल्लाळ कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर आणि मदारी मेहतर.







### अखेर तो दिवस उजाडला

आग्र्याहून सुटकेचा तो दिवस अखेर उजाडला. महाराजांनी संपूर्ण तयारी केली होती. १७ ऑगस्ट १६६६ चा तो दिवस. जवळपास एक हजार सैनिकांच्या खड्या पहाऱ्यातून शिवाजी महाराज सुखरूप बाहेर पडले होते. यासाठी महाराजांनी शक्कल लढवली होती ती म्हणजे मिठाईच्या पेटाऱ्याची. पेठाऱ्यात बसून महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतून सुटले होते. परंतु, अनेक इतिहासकारांच्या मते शिवाजी महाराज हे पेठाऱ्यातून नाही तर पेठाऱ्याचे भाई बनून बाहेर पडले.

### अशी होती योजना

श्रीकृष्ण जन्मोस्तवानिम्मीत मिठाई वाटण्याचे महाराजांनी ठरवले. बादशहाकडे अर्ज करून हे आमचे पूर्वापार व्रत असून ते करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली. बादशाहने देखील लगेच परवनागी दिली. मिठाई भरलेले पेठारे आग्र्यातील प्रतिष्टीत मंडळी, सरदार, बादशाही वजीर, फकीर, साधू आणि गरीब जनतेकडे जाऊ लागले. मिठाई वाटपावेळी शिवाजी महाराजांच्या निवास्थानी गर्दी होऊ लागली. पाहरेकरी पेटारे उघडून पाहणी करत असत मगच पेटारे बाहेर जात असत. महाराजांनी मुलचंद सावकारामार्फात सर्व जडजवाहीर मोती, सोने, मोहरा दक्षिणेत पाठवून दिले. आता रोज पेठारे भरून मिठाई वाटण्यात येऊ लागली होती. त्यामुळे पहारेकरी पहिल्यासारखे कसून तपास न करताच एखाद दुसरा पेटारा तपासात व उर्वरित पेठारे तसेच जाऊ देत. हीच संधी होती शिवाजी महाराजांना तेथून सुटण्याची.

### महाराज मथुरेला रवाना झाले

१६ ऑगस्ट रोजी रामसिंग शंभूराजांसोबत औरंगजेबाच्या दरबारी मुजऱ्यास गेला असता औरंगजेबाने महाराजांनी मनसब कबुल करून त्यांच्याकडील किल्ले बादशहास सोपवून काबुलच्या स्वारीवर जावे असे आदेश दिले. परंतु,शिवाजी महाराजांनी बादशाहाचा हा आदेश नाकारला. औरंगजेबाचा हा शेवटचा इशारा शिवाजी महाराजांना समजला आणि० त्यांनी अग्र्यातून निसटून स्वराज्यात परतण्याच्या मोहिमेला पूर्णस्वरूप देण्याचे ठरवले. १७ ऑगस्ट रोजी जुम्माचा दिवस असल्याने औरंगजेबाचा दरबार बंद होता. मशिदीत बादशाहसह सर्व जनता आणि दरबारी अधिकारी नमाजासाठी जाणार होते. शंभूराजे आज महाराजांसोबतच असणार होते. दुपारच्या सुमारास महाराजांचे डोके दुखू लागले. प्रकृती ठीक नसल्याने महाराज झोपी गेले आणि एक मुलगा त्यांचे पाय चेपीत तेथे बसला. मथुरेतील ब्राम्हण आणि फाकीरांना मिठाई वाटण्यासाठी पेटाऱ्यात मिठाई भरली जाऊ लागली. महाराज झोपेतून उठले आणि त्या ठिकाणी हिरोजी फर्जंद झोपी गेले. संध्याकाळच्यावेळी पेटारे मथुरेस रवाना झाले. त्यातील दोन पेटाऱ्यात शिवाजी महराज आणि शंभूराजे बसले. पहारेकऱ्यांनी पहिले दोन पेटारे तपासले व उर्वरित पेटारे न तपासताच जाऊ दिले आणि महाराज बादशहाच्या कैदेतून निसटले.

# पोको एम ७ प्लस ५ जी भारतात लाँच

मुंबई : हॅलो प्रभात




पोको या भारतातील आघाडीच्या ग्राहक तंत्रज्ञान ब्रँडने किफायतशीर स्मार्टफोन श्रेणीमधील नवीन स्मार्टफोन 'पोको एम७ प्लस ५जी'च्या लाँचची घोषणा केली. नॉन-स्टॉप मनोरंजन आणि दीर्घकाळपर्यंत कार्यक्षमतेसाठी डिझाइन करण्यात आलेला एम७ प्लस ५जी श्रेणीमध्ये अग्रस्थानी आहे. या स्मार्टफोनमध्ये विशाल ७००० एमएएच सिलिकॉन कार्बन बॅटरी आणि १४४ हर्ट्झ रिफ्रेश रेटचे पाठबळ असलेला ६.९-इंच एफएचडी+ डिस्प्ले आहे, ज्यामुळे हा स्मार्टफोन दिवसभरातील मनोरंजनासाठी उत्तम सोबती आहे. या स्मार्टफोनची किंमत फक्त १२,९९९ रूपये आहे. पोको एम७ प्लस ५जी विनासायास मल्टीटास्किंगसाठी स्नॅपड्रॅगन ६एस जेन ३ सह सर्वोत्तम कार्यक्षमता देतो, तसेच या स्मार्टफोनमध्ये जवळपास १६ जीबी टर्बो रॅक आहे. १४४ हर्टझ रिफ्रेश रेटमधील सुलभ स्क्रॉलिंग, सर्वोत्तम गेमिंग आणि विनासायास सोशल मीडिया ब्राऊजिंगची खात्री मिळते.

# स्कोडाने सुरक्षित रस्ते, सुरक्षित भारतचे वचन केले पूर्ण

मुंबई : हॅलो प्रभात

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने स्कोडा ऑटो फॉक्सवॅगन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसएव्हीडब्ल्यूआयपीएल)ने सेव्हलाइफ फाऊंडेशनच्या भागीदारीत उत्तरप्रदेशातील राष्ट्रीय राजमार्ग १९ वरील आग्रा-इटावा-चकेरी विभागातील दोन वर्षांचा झीरो फेटॅलिटी कॉरिडॉर प्रोग्राम यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे जाहीर केले. सेव्हलाइफ फाऊंडेशनच्या झेडएफसी (झीरो फेटॅलिटी कॉरिडॉर) व्हिजनमधून इंजिनियरिंग, इमर्जन्सी केअर, एन्फोर्समेंट आणि एड्युकेशन फॉर रोड सेफ्टीचा समावेश करणाऱ्या बहु-आयामी आणि पुरावा-आधारित दृष्टिकोणाच्या माध्यमातून मार्ग अकस्मातांमधील मृत्यूची संख्या कमी करण्यासाठी एक अनुकरणीय आणि स्केलेबल मॉडेल उभे राहिले आहे. परिणामी, 'सुरक्षित रस्ते, सुरक्षित भारत' या अभियानामुळे आधार वर्षाच्या तुलनेत मार्ग अकस्मातात झालेल्या मृत्यूंची संख्या ७.५% ने कमी झाली आहे व अशाप्रकारे ७.२ लाख प्रवाशांसाठी मार्ग सुरक्षा वाढली आहे.

# ड्रोनाचार्य एरियल इनोव्हेशन्सला रु.९९.६७ लाखांची वर्क ऑर्डर

पुणे : हॅलो प्रभात

ड्रोन पुरवठा आणि प्रगत ड्रोन लॅब उभारण्यासाठी ड्रोनाचार्य एरियल इनोव्हेशन्स लिमिटेडला भारतीय लष्कर - संरक्षण मंत्रालयाने रु. ९९.६७ लाखांची वर्क ऑर्डर दिली आहे. या प्रकल्पामुळे लष्कराच्या ड्रोन प्रशिक्षण क्षमतेत लक्षणीय वाढ होईल. ज्यामुळे लष्करी कर्मचाऱ्यांना हेरगिरी, पाळत ठेवणे आणि एफपीव्हीड्रोन ॲप्लिकेशनचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल. अत्याधुनिक ड्रोन प्रयोगशाळा आणि एकात्मिक ड्रोन प्रणाली स्थापन करण्याबरोबरच लढाऊ एफपीव्ही ड्रोन पाळत ठेवणारे ड्रोन, प्रशिक्षण ड्रोन आणि खास तयार करण्यात आलेले नॅनो ड्रोन यासारख्या ड्रोनच्या विस्तृत श्रेणीचा पुरवठा या कामाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहे. लढाऊ अभियांत्रिकी प्रशिक्षणाचे आधुनिकीकरण करणे, वास्तविक परिस्थितीजन्य जागरूकता सुधारणे आणि रेजिमेंटमध्ये सामरिक कार्यक्षमता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ व डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या प्रांगणात कुलपती डॉ. संजय डी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी डी वाय पाटील ग्रुपचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, परीक्षा नियंत्रक अभय जोशी, रिसर्च डायरेक्टर डॉ. सी.डी.लोखंडे, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र नेरली, प्राचार्य रुधिर बारदेस्कर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण व त्यानंतर राष्ट्रगीत झाले. यावेळी डॉ. संजय डी. पाटील यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांनी




नशमुक्तीची शपथ घेतली. यानंतर एनसीसी विद्यार्थांनी संचलन करत मानवंदना दिली.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, प्राचार्य डॉ.चंद्रप्रभू जंगमे, डॉ. अजित पाटील, डॉ. उमराणी जे, डॉ. अद्वैत राठोड, डॉ. अमृतकुवर रायजादे, डॉ. आर. एस. पाटील, उपकुलसचिव संजय जाधव, सहाय्यक कुलसचिव अजित पाटील, तेजशिल इंगळे, जयदीप पाटील आदींसह विविध विभागाचे प्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कसबा बावड्यातील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, प्राचार्य डॉ. महादेव नरके, रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. संजय पाटील यांनी भारतमाता व महापुरुषांच्या वेशभूषेत आलेल्या छोट्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

उपस्थिताना त्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध विभागांचे प्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, आणि ग्रुपच्या विविध शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिव्हप्युअरची आर्थिक वर्षात ४० नवीन स्टोअर्स सुरू करण्याची योजना

मुंबई : हॅलो प्रभात

लिव्हप्युअर या भारतातील ग्राहकांच्या स्वास्थ्याप्रती समर्पित आघाडीच्या व सर्वात विश्वसनीय ग्राहक-केंद्रित ब्रँडने गुरगाव, हरियाणामध्ये पहिले एक्सक्लुसिव्ह ब्रँड आऊटलेट व एक्स्पेरिअन्स सेंटर लाँच केले आहे. या केंद्रामध्ये सर्वोत्तम, प्रायोगिक स्वरूपात एकाच छताखाली लिव्हप्युअरच्या परिपूर्ण उत्पादन परिसंस्थेचा समावेश आहे. आपल्या रिटेल धोरणाचा भाग म्हणून कंपनीची या आर्थिक वर्षामध्ये ४० आणखी स्टोअर्स सुरू करण्याची योजना आहे.

# क्रांतिकारकांच्या योगदानातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी : प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे

तासगाव : हॅलो प्रभात

क्रांतिकारकांनी दिलेले बलिदान आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. क्रांतिकारकांच्या योगदानातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांचे योगदान या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना



काढले.

प्राचार्य पुढे म्हणाले क्रांतीकारकांना आदर्श म्हणून पाहिले पाहिजे आणि आपणही समाजासाठी काहीतरी योगदान दिले पाहिजे असे सांगून क्रांतिकारकांनी मिळिवलेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाने पुढे येण्याचे आवाहन त्यांनी तरुणांना केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. पल्लवी मिरजकर यांनी केले.

तर आभार शिवा सिंदोळकर यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ऋतुजा शिंगाडे हिने केले.

# राष्ट्राला प्रगती आणि समृद्धीसाठी आशिषकुमार चौहान यांनी दिल्या शुभेच्छा

मुंबई : हॅलो प्रभात

या स्वातंत्र्यदिनी, आपण आपल्या राष्ट्राच्या प्रवासाला आकार देणाऱ्या मूल्यांचे आणि दृढनिश्चयाचे महत्त्व साजरे करत आहोत. भारताने स्वातंत्र्याची ७९ वर्षे पूर्ण केली आहेत. आपण एक आत्मविश्वासू राष्ट्र म्हणून अभिमानाने उभे आहोत, जे सर्वांसाठी एक चांगले भविष्य घडवण्याकरिता तसेच आपले जागतिक अस्तित्व वाढवण्यासाठी विकास आणि नवनिर्मितीसाठी वचनबद्ध आहे. सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या खूप खूप शुभेच्छा, असे एनएसईचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी,आशिषकुमार चौहान म्हणाले.

# जेम ॲरोमॅटिक्सची सार्वजनिक ऑफर १९ ऑगस्ट रोजी उघडणार

मुंबई : हॅलो प्रभात

जेम ॲरोमॅटिक्स लिमिटेडने त्यांच्या सुरुवातीची सार्वजनिक ऑफरसाठी २ रु. दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी ३०९ रु. ते ३२५ रु. किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, १९ ऑगस्ट रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ४६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ म्हणजे १,७५०.०० दशलक्ष रुपयांपर्यंतच्या नवीन शेअर्सचा आणि ८,५००,००० इक्विटी शेअर्सचा प्रमोटर आणि गुंतवणूकदार विक्री करणाऱ्या शेअरहोल्डर्सचा समावेश असलेला विक्रीचा प्रस्ताव आहे. जेम ही भारतातील आवश्यक तेले, सुगंध रसायने आणि मूल्यवर्धित डेरिव्हेटिव्हजसह विशेष घटकांची स्थापित उत्पादक आहे ज्याचा दोन दशकांहून अधिक काळचा ट्रॅक रेकॉर्ड आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक हॅलो प्रभात हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ सांगली मुख्य कार्यालय : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ पुणे कार्यालय : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६ ■ कोल्हापूर कार्यालय : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

## एस.एस.जी.एम.महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा संपन्न




**कोपरगाव : हॅलो प्रभात**

सद्गुरू गंगागीर महाराज संस्थेच्या गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, येथे ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त 'राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय विकास' या संकल्पनेवर आधारित रांगोळी व भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेमध्ये विविध विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. महाविद्यालयात प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर रयत बँकेच्या कोपरगाव शाखेचे शाखाप्रमुख सालमुठे यांच्या हस्ते व रांगोळी स्पर्धा व भित्तिपत्रक स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. भित्तिपत्रक स्पर्धेत ५८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला तर रांगोळी स्पर्धेत २२ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त दौंड विधानसभा मतदारसंघात 'हर घर तिरंगा मोहीम'



**दौंड : हॅलो प्रभात**

भारताच्या एकोणऐंशीव्या सातंत्र्य दिनानिमित्त देशभरात विविध राज्यांमध्ये हर घर तिरंगा मोहीम राबवण्यात येत आहे. दौंड विधानसभा मतदारसंघाचे आ. राहुल कुल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार अभियानांतर्गत राहू येथील निवासस्थानी तिरंगा फडकावून देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या राष्ट्रनायकांचे स्मरण केले. मतदारसंघातील गलांडवाडी येथे तिरंगा रॅलीला आ. कुल यांनी संबोधित केलं. दौंड भाजपा प्रदेश उपाध्यक्षा कांचन कुल, राज्य परिषद सदस्य उमेश देवकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होते.

## पिंप्री अवघड शाळेत स्वातंत्र्यदिना निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन




**राहुरी : हॅलो प्रभात**

पिंपरी अवघड जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. प्रथम प्रभात फेरी काढण्यात आली तर ग्रामपंचायतीचा ध्वज माजी सरपंच परवीनबानो शेख यांच्या हस्ते फडकाविन्यात आला तर जिल्हा परिषद शाळेतील ध्वज माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य शिवाजी सोपान लांबे यांच्या हस्ते फडकवण्यात आला. या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक काशिनाथ नाना दोंड हे होते, यावेळी सर्वच महापुरुषांबद्दल विद्यार्थ्यांनी भाषणे केली, यावेळी पिंपरी अवघड गावचे माजी सरपंच व प्रहार जनशक्ती पक्षाचे राहुरी तालुकाध्यक्ष शेतकरी नेते सुरेशराव लांबे पाटील यांनी सर्वच महापुरुषांबद्दल व स्वातंत्र्याबद्दल मनोगत व्यक्त केरुन मुलांच्या सर्वांगीण विकास दृष्टीने मार्गदर्शन करुन सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## गरवारे कन्या महाविद्यालयामध्ये बदललेल्या अभ्यासक्रमावर कार्यशाळा

**सांगली : हॅलो प्रभात**

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बी.ए. भाग २ साठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या इंग्रजी, इतिहास व अर्थशास्त्र विषयांच्या अभ्यासक्रमावरील कार्यशाळा आयोजन करण्यात येणार आहे. २० ऑगस्ट रोजी इतिहास विषयावरील तर शुक्रवार, २२ ऑगस्ट रोजी इंग्रजी विषयावरील कार्यशाळा घेण्यात येणार आहे. अर्थशास्त्र विषयाची कार्यशाळा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात येण्यात येणार आहे. या कार्यशाळांमध्ये तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यशाळांना विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील संबंधित विषय शिकवणाऱ्या प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य सुगते तसेच कार्यशाळा समन्वयक डॉ. वैशाली जोशी व डॉ. उर्मिला क्षीरसागर, डॉ. रोहिणी देशपांडे यांनी केले आहे. या कार्यशाळेचे संयोजन करण्यामध्ये वुइमेन्स एज्युकेशन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. लताताई देशपांडे, उपाध्यक्ष स्मिताताई केळकर कार्यवाहक यशश्री आपटे सहकार्यवाह गायत्री कुलकर्णी आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य करत आहेत.

## स्कोडा ऑटोने २५ वा वर्धापन दिन केला साजरा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

भारतात २५ व वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वर्षे साजरी करत, स्कोडा ऑटो इंडिया ने त्यांच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या मॉडेल्सच्या मर्यादित आवृत्त्या सादर केल्या आहेत: कायलॅक, कुशक आणि स्लाव्हिया या विशेष, मर्यादित-असलेल्या आवृत्त्यांमध्ये विशिष्ट डिझाइनमध्ये सुधारणा केली आहे आणि प्रीमियम वैशिष्ट्ये आहेत, तसेच जे या खास टप्प्याला आणि ब्रँडच्या भारतीय बाजारपेठेतील सततच्या वचनबद्धतेला प्रतिबिंबित करते. या मर्यादित आवृत्त्या कुशक आणि स्लाव्हिया साठी मोंटे कार्लो, आणि कायलॅक साठी प्रेस्टीज आणि सिग्नेचर+ सारख्या विद्यमान हाय-स्पेक ट्रिम्सवर आधारित आहेत. स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, ङआम्ही भारतात स्कोडा ऑटोची २५ अविश्वसनीय वर्षे साजरी करत आहोत, ज्यात कायलॅक, कुशक आणि स्लाव्हिया यांच्या मर्यादित आवृत्तींचा समावेश आहे. स्पोर्टी एलिगन्स आणि प्रीमियम वैशिष्ट्ये असून, मोफत ॲक्सेसरीज किट आणि ड्रायव्हिंग अनुभव वाढवणारे स्मार्ट इनोव्हेशन्स यांचा समावेश आहे.

# विद्यार्थ्यांनी नव तंत्रज्ञानाचा उपयोग देश सेवेसाठी करावा

## विलास पाटील ; महाडिक संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात




**पेठ : हॅलो प्रभात**

नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुलात नया भारत या थीमसह ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त,

सहाय्यक पोलीस आयुक्त विलास पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. डॉ.महेश जोशी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा स्वागत व सत्कार करण्यात आला.या राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने संस्थेतील महाविद्यालयांनी देशभक्तीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान दर्शवणारे पोस्टर,सेल्फी पॉईट,फीडबॅक पॉईट, देशभक्तीपर गीते,नृत्य सादर केले तसेच आपली मनोगते व्यक्त करत व घोषणा देत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह व्दिगुणित केला.

प्रमुख पाहुणे विलास पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले,आजच्या दिवशी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या देशभक्तांच्या स्मृतींना आपण उजाळा देत असतो. विकसित भारत बनविण्यासाठी विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग देशसेवेसाठी करावा. समाजात वावरताना विद्यार्थांनी शिस्तबद्ध असणे आवश्यक आहे,सोशल मीडियाचा वापर नवनवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी करावा,२०४७ मध्ये भारत महासत्ता बनविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थांनी आपले योगदान शिक्षणाच्या माध्यमातून द्यावे,त्याचवेळी भारताचा प्रत्येक क्षेत्रात पूर्ण विकास होईल.

यावेळी प्राचार्य डॉ. सुनील आणेकर, डॉ.संतोष वाडकर,उपप्राचार्य चंद्रकांत पाटील, प्रा.राहुल चिटणीस, डॉ.एस.व्ही.पाटील, प्राचार्य डॉ. सुनिल शर्मा,व्यंकटेश्वरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विनोद कापसे यांच्यासह महाविद्यालयाचे विभागप्रमुख,सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन तनुजा चव्हाण हिने केले व आभार चंद्रकांत गावडे यांनी मानले.

## मोदींच्या नेतृत्वाखाली देशाची महासत्ता राष्ट्रांकडे वाटचाल : पृथ्वीराज देशमुख



**कडेगांव : हॅलो प्रभात**

तरुण पिढीने नोकरीच्या मागे न लागता स्वतःचे व्यवसाय उभारून रोजगार देण्याचा माणसं केला पाहिजे त्यामुळे स्वतःच्या भविष्य बरोबर इतरांचेही भविष्य घडेल आज महिलांच्या बचत गटाच्या माध्यमातून गावोगावी आर्थिक क्रांती घडत आहे.

मोदींच्या नेतृत्वाखाली देश आत्मनिर्भर झाला असून देशाची महासत्ता राष्ट्रांकडे वाटचाल सुरू असल्याचे सुतोवाच भाजपाचे माजी सांगली जिल्हाध्यक्ष माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनी केले ते खेराडे वांगी ता. कडेगाव येथे भाजपाच्या वतीने आयोजित तिरंगा रॅलीत ते बोलत होते.

यावेळी सांगली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष दत्तूशेठ सूर्यवंशी, भाजपाचे कडेगांव तालुकाध्यक्ष विकास सूर्यवंशी, पलूस तालुकाध्यक्ष मिलिंद पाटील, ओबीसी सांगली जिल्हा अध्यक्ष प्रकाश गडळे, लक्ष्मण कणसे, आनंदराव यादव, जगदीश महाडिक, उदय शिंदे, प्रमुख उपस्थित होते. पुढे बोलताना पृथ्वीराज देशमुख यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी या रॅलीत भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ३० मीटरच्या राष्ट्रध्वज स्तंभाचे लोकार्पण



**बारामती : हॅलो प्रभात**

स्वातंत्र्यदिनानिमित्त बारामतीच्या मध्यवर्ती ठिकाणी ३० मीटर उंचीचा राष्ट्रध्वज स्तंभ उभारण्यात आला असून, त्याचे लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. नटराज नाट्य कला मंडळाने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उभारलेला हा ध्वजस्तंभ शहराच्या अभिमानाचे नवे प्रतीक ठरला आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात पार पडलेल्या या सोहळ्याला बारामतीकरांचा प्रचंड उत्साह लाभला. परिसर तिरंग्याच्या रंगांनी सजविण्यात आला होता. विविध शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताच्या सुरात आणि भारत माता की जय घोषणांनी वातावरण दुमदुमले.

या भव्य ध्वजामुळे शहराचा नवा ओळखबिंदू निर्माण झाला आहे. बारामतीकरांसाठी हा केवळ ध्वज नाही तर अभिमान, प्रेरणा आणि राष्ट्रीय एकतेचे जिवंत प्रतीक आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार अल्पसंख्यांक सेल तर्फे पद वाटप कार्यक्रम संपन्न



**सांगली : हॅलो प्रभात**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलतर्फे पदवाटप कार्यक्रम शहर जिल्हाध्यक्ष संजय बजाज यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन शहर जिल्हा अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष आयुब बारगीर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. यावेळी शहर संजय बजाज म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसमावेशक विचारसरणीचा पक्ष आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुकीत जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जोरदारपणे लढणार आहोत. समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आगामी महापालिकेत नव्या चेहऱ्यांना संधी देऊन पक्षाची ताकद वाढवली जाईल. या कार्यक्रमात सांगली शहराध्यक्ष म्हणून असलम मुल्ला, तर शहर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून अब्दुल शेख यांची निवड करण्यात आली.

## काकांच्या पायाला स्पर्श म्हणजे आमच्या हातांचे भाग्य




इंद्रजीत देशमुख ; डॉ.देशमुख मुरगूड भूषण पुरस्काराने सन्मानित

**मुरगूड : हॅलो प्रभात**

डॉक्टर काकांच्या पायांना स्पर्श म्हणजे आमच्या हातांचे भाग्य असे भावस्पर्शी उद्गार शिवम प्रतिष्ठानचे प्रणेते इंद्रजीत देखमुख यांनी डॉ.देशमुख यांच्या मुरगूड भूषण पुरस्कार सोहळ्यात काढले.

स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सोडून असंख्य भक्त भाविकांना गेली ५० वर्षे आध्यात्मिक ज्ञानाचे मार्गदर्शन करणाऱ्या ९१ वर्षीय डॉ.श्रीकृष्ण देशमुख यांना ७९ व्या स्वातंत्र्यदिनी मुरगूड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शब्दप्रभू इंद्रजीत देशमुख यांच्या सुश्राव्य वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. डॉ.देशमुख यांच्या आध्यात्मिक सेवेचा आढावा घेतांना ते म्हणाले,डॉक्टरांच्या चेहऱ्यावरचे भाव आजही उमलत्या फुलांसमान आहेत.सभागृहाबाहेर पाऊस पडतो आहे. तो ही त्यांना ताजेपणाच्या शुभेच्छा देण्यासाठी सूत्रसंचालनजस्मिन जमादार यांनी केले. राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

# संजीवनी प्रतिष्ठानची दहीहंडी देशासाठी लढणाऱ्यांना समर्पित

## विवेक कोल्हे



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

विवेक कोल्हे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली, संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांची मानाची दहीहंडी मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. महाराजांचा गगनभेदी जयघोष, ऑपरेशन सिंदूर चे आकर्षक फ्लेक्स, सैन्य शस्त्रांचा देखावा आणि वाजतगाजत आलेल्या पथकांनी डीजेच्या तालावर झालेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यंदा दहीहंडी उत्सवाला राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रप्रेम यांची विशेष जोड देण्यात आली होती. या प्रसंगी 'एक राखी जवानांसाठी – शिर्डी ते श्रीनगर' या उपक्रमाची चित्रफीत सादर करण्यात आली. तसेच ऑपरेशन सिंदूरमधील शूर जवानांच्या पराक्रमाचा जयघोष करत भारतीय सैनिकांना मानवंदना देण्यात आली.

गोकुळाष्टमीच्या पारंपरिक उत्सवाबरोबर देशभक्तिपर गीते, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष आणि भारतमातेचा गजर यामुळे वातावरण भारून गेले.

देशप्रेम, संस्कृती आणि श्रद्धेचा महोत्सव संजीवनी युवा प्रतिष्ठानसोबत,दहीहंडीचा एकच सूर देशाचा विजयी सिंदूर,राष्ट्रभक्तीच्या गजरात, परंपरा आणि एकतेचा उत्सव,स्वातंत्र्याची शपथ, श्रद्धेचा दीप परंपरेचा उत्सव या घोषवाक्यांनी परिसरात अद्वितीय उर्जा निर्माण झाली. दहीहंडीच्या खेळामध्ये विविध पथकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या प्रसंगी विवेक कोल्हे यांनी गोविंदा पथकांना व उपस्थित नागरिकांना दहीहंडीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, संजीवनी युवा प्रतिष्ठानने यावर्षी दहीहंडी राष्ट्रप्रेमाच्या थीमवर साजरी केली आहे.संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक कार्यांचा उल्लेख करत त्यांनी युवकांचे कौतुक केले आणि त्यांचा उत्साह वाढवला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक,पदाधिकारी,युवासेवक यांची उपस्थिती होती.

## हनुमान पतसंस्थेचा शंभर कोटींचा टप्पा पार : बळवंत पाटील




**कोतोली : हॅलो प्रभात**

हनुमान पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेच्या ठेवींचा आकडा तब्बल १०० कोटी ५० लाखांवर पोहोचला असून, चालू आर्थिक वर्षात १ कोटी ४७ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा नफा झाल्याचे जाहीर करण्यात आले. अहवालाचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी भीमराव फिरींगे यांनी केले. यावेळी विविध मान्यवर व पदाधिकाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला.

सभेला संजीवनी कांबळे, बाजीराव लव्हटे, विश्वास मस्कर, मानसिंग पाटील, प्रकाश पोवार राज गंधवाले, एम.डी. पाटील, रणजित चौगुले, मधुकर रेडेकर, विनायक साळोखे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात चेअरमन बळवंत पाटील मास्तर, व्हा. चेअरमन तानाजी पाटील व उपसरपंच प्रकाश पाटील,सागर वरपे, कृष्णा पाटील, विनायक रेडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. हनुमान दूध संस्थेची ३३ वी वार्षिक सभा चेअरमन मानसिंग पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेचा अहवाल विलास लव्हटे यांनी सादर केला. भैरवनाथ सेवा संस्थेची वार्षिक सभा दिनकर रेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेचा अहवाल सचिव बाळासाहेब गायकवाड यांनी अहवाल वाचन यांनी केले.

## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा




**सांगली : हॅलो प्रभात**

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही.पोरे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

उपस्थितांना संदेश देताना ते म्हणाले की, १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारत आपला ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे. संपूर्ण देश हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतो. त्याचबरोबर आपल्या प्रत्येक भारतीयांना स्वातंत्र्याच्या लढ्याची आठवण करून देतो व देशासाठी प्रेम,आदर आणि एकता वाढवतो. देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्या वीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली यांचे सर्वप्रथम स्मरण या दिवशी केले पाहिजे.

यावेळी एन.सी. सी. मधील विद्यार्थ्यांनी मानवंदना संचलनाचे प्रात्यक्षिक सादर केले. याप्रसंगी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्यासाठी विविध कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. तसेच एन.एस.एस. विभागाच्या वतीने हर घर तिरंगा या मोहिमे अंतर्गत जनजागरण रॅली सांगलीवाडी परिसरात काढण्यात आली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.ए.आर.सुपले, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा. अरूण जाधव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.अमर तुपे, एन. एस. एस. विभागप्रमुख डॉ. रुपाली कांबळे, एन. सी. सी. विभागप्रमुख डॉ.महेश कोल्हाळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन जिमखाना विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# लेखक व विचारवंतांनी सत्याचे झेंडे हाती घ्यावेत: प्रा.मिलिंद जोशी




**सांगली : हॅलो प्रभात**

अलीकडच्या काळात साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात सुरू असलेल्या लक्षणीय घडामोडींचामुळे लोकांच्या संवेदना बोथट होत चालल्या आहेत या पार्श्वभूमीवर साहित्यिक व विचारवंतांनी सत्याचे झेंडे हाती घेण्याची गरज आहे असे मत प्रसिद्ध वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

सांगली येथील राज ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने कृषीभूषण दादासाहेब ठिगळे यांच्या स्मरणार्थ सांगली येथील रोटरी क्लबच्या सभागृहात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी यांचे साहित्य,समाज आणि संवेदना 'या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.तारा भवाळकर होत्या.

प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करताना प्रा.संजय ठिगळे म्हणाले की, आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने ग्रामीण विकास संस्था स्थापन केली आहे. याप्रसंगी प्रा.मिलिंद जोशी यांची अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर समीक्षक प्रा.अविनाश सप्रे, महेश कराडकर व ऋतुराज ठिगळे यांचा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य व पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मिलिंद जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सांगली येथील ज्ञानदीप वाचनालयास पुस्तके व निधी भेट देण्यात आला.

मार्गदर्शनपर भाषणात प्रा.जोशी म्हणाले की, समाजाला संवेदनशील साहित्यिक व विचारवंतांची गरज आहे. त्यांच्या संवेदना अधिक बोथट झाल्या तर समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही. त्यामुळे संवेदनशील माणूस निर्माण होईल अशी व्यवस्था तयार करावी लागणार आहे. अध्यक्षपदावरून बोलताना डॉ.तारा भवाळकर म्हणाल्या की, भाषा ही माणसाला जोडण्याचे कार्य करते. संस्कृती ही नदीसारखी वाहती असली पाहिजे त्याशिवाय समाजाचा खरा विकास होणार नाही.असते. माणूस हा विकासाच्या नावाखाली निसर्गापासून आणि मातीपासून दूर चालला आहे हे समाजाच्या दृष्टीने हिताचे नाही. उपस्थितांचे आभार राजेश ठिगळे यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल मोहिते यांनी केले.

कार्यक्रमास प्रा. शामराव पाटील, गौतमीपुत्र कांबळे, दि.बा.पाटील, अंजुमन खान, धनंजय जोशी, डॉ.अनिल मडके, सौ.मालन मोहिते, रमेश लिधडे त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# संशोधनाचा विषय नाविन्यपूर्ण असावा : मृगेंद्र गुरव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोणत्याही विषयांमध्ये संशोधन करताना ते नाविन्यपूर्ण व समाजाभिमुख असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन श्री.मृगेंद्र गुरव यांनी केले. जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विभागाच्यावतीने ङ्कशोधनिबंध कसा लिहावाङ्क या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य व रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) ज्ञानदेव झांबरे हे होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. (डॉ.) चंद्रकांत कांबळे, श्रीमती दिपाली पाटील, डॉ.संदीप वाटेगावकर उपस्थित होते.



संशोधन कसे करावे याविषयी बोलताना मृगेंद्र गुरव पुढे म्हणाले, शोधनिबंध लिहिताना त्या विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. एखाद्या विषयावर अगोदर संशोधन झाले असले तरी तो विषय नाविन्यपूर्ण पद्धतीने मांडता येतो. संशोधनाला कोणत्याही विषयाचे बंधन नसते. विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळले पाहिजे. आज अनेक नवनवीन क्षेत्रे असून ती संशोधनाची वाट पाहत आहेत. नाविन्यपूर्ण व समाजाभिमुख संशोधनासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या निधी उपलब्ध आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला प्राधान्य असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेऊन आपल्या ज्ञानात भर घातली पाहिजे. संशोधन करताना संदर्भ कसे द्यावे, आकृत्या, टेबल्स, चार्ट यांचा वापर कसा करावा याची माहिती त्यांनी प्रात्यक्षिकासह दिली.

उपप्राचार्य प्रा. (डॉ.) चंद्रकांत कांबळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, कोणतेही संशोधन करताना ते केवळ निरीक्षणावरती आधारित न ठेवता त्याला संदर्भाची जोड देणे आवश्यक असते. संशोधनावर आधारित अशा प्रकारची व्याख्याने झाल्यास त्याचा विद्यार्थ्यांना फार मोठा फायदा होणार आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. (डॉ.) ज्ञानदेव झांबरे यांनी संशोधनाच्या पद्धतीवर प्रकाशझोत टाकला. पूर्वीच्या काळी कृत्रिम बुद्धिमत्ता अवगत नसल्याने संदर्भ शोधण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन त्याचा शोध घेतला जात असे. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर केला जात असला तरी त्याचा योग्य ठिकाणी वापर करण्यात यावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संदीप वाटेगावकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख दीपाली पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता सुर्वे आणि राजेश्वरी कामटे यांनी केले तर आभार प्रियांका जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूजा जायगुडे, ऋतुजा भोईटे, सोमीनाथ सानप,अजित पांढरे, धनश्री शिर्के, मयुरी सावंत, नवनाथ ठोंबरे, महाविद्यालय विकास समिती सदस्य श्री. अनिल सावंत, अनिल लाखे, अनिल बोडरे, चेतन तावरे, शुभम पिसाळ, शिवम सूर्यवंशी सचिन इथापे आणि किशोर पिसाळ आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

# मत चोरी विरोधात काँग्रेसचा मशाल मोर्चा



**जत : हॅलो प्रभात**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला जत तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष मा.आ. विक्रमसिंह सावंत यांच्या अध्यक्षतेखाली मतचोरीच्या विरोधात भव्य मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाची सुरुवात शहरातील मार्केट यार्ड येथून झाली. या मोर्चात काँग्रेस कार्यकर्त्यांनी मशालींच्या प्रकाशात, विविध घोषणा देत सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढविला. या मशाल मोर्चाची सांगता मारुती मंदिर परिसरात सभेच्या रूपात झाली.

या मोर्चाच्या समारोप सभेत कार्यकर्त्यांना व नागरिकांना संबोधित करताना विक्रमसिंह सावंत म्हणाले की, लोकशाहीची प्रतिष्ठा राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मतचोरी म्हणजे देशाच्या जनतेबरोबर केलेला विश्वासघात आहे. या विश्वासघाताचा बदला देशातील जनता घेतल्याशिवाय राहणार नाही. स्वायत्त संस्थांना सोबत केलेली मतचोरी ही देशद्रोहासमान आहे. देशद्रोही कृत्य करणाऱ्यांना कायद्याच्या कचाट्यात आणल्याशिवाय काँग्रेस पक्ष स्वस्थ बसणार नाही. राहुल गांधींनी मत चोरीच्या विरोधात उभा केलेल्या लढ्यात समाजातील सर्व घटकांनी सहभाग घ्यावा.

या ऐतिहासिक मशाल मोर्चामध्ये शहर व तालुक्यातील शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक काँग्रेस, NSUI तसेच काँग्रेसप्रेमी नागरिक सहभागी झाले.

या मोर्चामध्ये बाबासाहेब कोडग, अशोक बन्नेनवर, युवराज बाळ निकम,संतोष जगताप ,सुभाष बिरादार, अमोल पवार, अरुण साळे, जाकेश अदाटे, अजित माळी, दिलीप धोत्रे यांच्यासह मान्यवरांनी उत्स्फूर्त हजेरी लावली.

# श्री दत्त कारखान्याच्या वतीने ऊसतोड मजूर विमा चेक प्रदान



**शिरोळ : हॅलो प्रभात**

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ऊसतोड मजुरांसाठी अपघात विमा पॉलिसी घेतली जाते. कारखान्याच्या ऊस तोडणी मजुराच्या सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून अपघात विमा पॉलिसी घेतली आहे. दुर्दैवाने एखाद्या ऊसतोड मजुराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विम्याची रक्कम पॉलिसीमुळे मिळते. सदर विमा पॉलिसी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांचे कडून धारण केलेली आहे. याच पॉलिसी अंतर्गत श्रवण बाबुराव राठोड रा. नरवाडी ता. सोनपेठ जिल्हा परभणी यांचा दि.२४/५ /२५ रोजी साप चावून मृत्यू झाला होता पॉलिसी अंतर्गत त्यांचे वारस शोभा श्रावण राठोड यांना ३ लाख रुपये चा चेक दत्त उद्योग समूहाचे प्रमुख गणपतराव पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

याप्रसंगी ऊस वाहतूक संघटना अध्यक्ष धनाजी पाटील नरदेकर, रावसाहेब आबदार,शिवाजीराव देशमुख,उदय शिलेदार,कल्लेश्वर वाघमोडे, मुख्य शेती अधिकारी श्रीशैल हेगान्ना, अमर चौगुले, इन्शुरन्स कंपनीचे सदानंद कुलकर्णी आदी उपस्थित होते

# मिरजेत तिरंगा रॅली उत्साहात संपन्न

**मिरज : हॅलो प्रभात**

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मिरज शहरात सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील छ.शिवाजी महाराज पुतळा येथून रॅलीची सुरवात झाली. ही रॅली गणेश तलाव, सराफ कट्टा, लक्ष्मी मार्केट, महाराणा प्रताप चौक, किसान चौक मार्गे शहर पोलीस ठाण्यासमोर आली व येथे रॅलीचा समारोप झाला.




आ.सुरेशभाऊखाडेयांच्यासह विविध पक्ष, विविध संघटनांचे मान्यवर पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक, शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनसीसी विद्यार्थी, माजी सैनिक, महिला भगिनी, राष्ट्रप्रेमी नागरिक या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भर पावसात राष्ट्रप्रेमी नागरिकांनी भारत माता कि जय, वंदे मातरमच्या घोषणा देत मोठ्या उत्साहात रॅली पूर्ण केली. देशभक्तीपर गाणी वाजविणारा बँड, एन.सी.सी. चे गणवेशातील छात्र , उपस्थितांच्या गळ्यातील तिरंगा मफलर व हातातील तिरंगा झेंडे यामुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. रॅलीच्या समाप्तीनंतर आ.खाडे यांनी सर्व जनतेला भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या व सामूहिक राष्ट्रगीत होऊन रॅलीचा समारोप झाला.

# नव कृष्णा व्हॅली स्कूल येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात

**कुपवाड : हॅलो प्रभात**

सुरज फाउंडेशन ग्रुप ऑफ नव कृष्णा व्हॅली स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मार्फत ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साह साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात सकाळी मुख्य पाहुणे निवृत्त कॅप्टन संदिपान शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी यशवंत तोरो, संचालिका संगीता पागनीस, पालक प्रतिनिधी, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.




ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर झाले आणि विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूहगीतांनी वातावरण भारावून टाकले. पाहुण्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून संविधानिक मूल्ये, शिस्त, सेवाभाव आणि मेहनत या गुणांचे पालन करण्याचे आवाहन केले.

यावेळी प्राचार्य अधिक पवार, रघुनाथ सातपुते, उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, विनायक जोशी ,राजेंद्र पाचोरे, प्रदीप पाटील ,दत्तात्रय मुळे, श्रीशैल मोटगी, सुनिता पाटील, शैला कोटे, अब्दुल देवर्षी आदी विभाग प्रमुख उपस्थित होते.

# स्वतंत्र्य दिनानिमित्त शालेय साहित्य व मिठाई वाटप

**कडेगाव : हॅलो प्रभात**

संपूर्ण जगाला हिंदू मुस्लिम ऐक्याची शिकवण देणाऱ्या कडेगाव शहरांमध्ये स्वतंत्र दिनानिमित्त आयएस ग्रुप अध्यक्ष व विश्वसंग्राम फाऊंडेशन संचालक इम्तियाज ऊर्फ बाळु भैय्या शेख व माऊली उद्योग समूह अध्यक्ष रविराज घाडगे हे दरवर्षी छत्रपती संभाजी महाराज चौक या ठिकाणी स्वातंत्र्य दिनचा आगळावेगळा उपक्रम साजरा करत असतात.



सालाबाद प्रमाणे आयएस ग्रुपच्या सौजन्याने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत इम्तियाज उर्फ बाळू भाई शेख आणि रविराज घाडगे यांनी कडेगाव नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे याा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व मिठाई वाटप केले

यावेळी निलेश लंगडे, विजय गायकवाड, उदयकुमार देशमुख, भाजपाचे कडेगाव शहराध्यक्ष नगरसेवक संदीप गायकवाड, अँड. अश्रफ इनामदार, जाकीर मुल्ला, आमन गोलंदाज शाहरुख बागवान, योगेश होलमुखे, अरबाज तांबोळी यांच्या सह आयएस ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त शहीद कुटुंबीयास मदतीचा चेक सुपुर्त

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

डीकेटीईचा स्वातंत्र्य दिन हा नेहमीच विविध उपक्रमांनी मोठया उत्साहात साजरा केला जातो. यंदाचा ध्वजारोहण समारंभ हा शिरोळ येथील वीर शहीद जवान सुरज भारत पाटील यांच्या वीरमाता सौ. सुरेखा भारत पाटील व त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते संपन्न झाला. ध्वजारोहण झालेनंतरच्या कार्यक्रमात त्यांना डीकेटीई परिवार यांच्यातर्फे हौताम्य वंदन व सैनिक परिवारास कृतज्ञतानिधी समर्पण करण्यात आला. संस्थेच्या सचिव डॉ. सौ. सपना आवाडे व कार्यकारी संचालक रवी आवाडे यांच्या हस्ते वीरमाता सौ. सुरेखा पाटील व कुटुंबीयाकडे मदतीचा चेक सुपुर्द करण्यात आला.



डीकेटीईने समाजाशी बांधिलकी जपत देशसेवेसाठी आपल्या बलिदानाची आहुती देणा-या महाराष्ट्रातील वीरपुत्र सुरज भारत पाटील यांना श्रध्दांजली अर्पण करीत शहीद झालेल्या जवानाच्या कुटुंबीयास कृतज्ञतानिधी दिली. शहीद सुरज पाटील यांच्या वीरमाता सुरेखा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरवात झाली. प्रा. डॉ. ए.आर.बलवान यांनी प्रास्ताविक केले. कर्तव्याप्रती भावना ठेवून शहीद जवानांच्या कुटुबियाच्या दुखाःत आम्ही सहभागी आहोत व संपुर्ण देश शहीद सुरज पाटील यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी आहे देशाच्या सीमेवर जवान कार्यरत असतात म्हणून सर्व जनता सुरक्षित असते. अशी भावना यावेळी संस्थेच्या सचिव डॉ.सौ. सपना आवाडे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास संस्थेचे कार्यकारी संचालक रवी आवाडे, संचालिका प्रा. डॉ. एल.एस.अडमुठे, उपसंचालक डॉ.यु. जे. पाटील, प्रा.ए.व्ही. शहा, सर्व विभागप्रमुख आदी उपस्थित होते.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**पुणे : हॅलो प्रभात**

भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांचा जयघोष, पारंपारिक वेशामध्ये नटलेले चिमुकले, मॅनेट कॅडेट्सची अभूतपूर्व कवायत आणि हजारो विद्यार्थ्यांच्या देशभक्तीने भारलेल्या वातावरणात येथील एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या ङ्कमॅनेटङ्क इमारतीच्या प्रांगणात भारताचा ७९वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



नौदल कर्मचाऱ्यांचे माजी उपप्रमुख, व्हाइस ॲडमिरल मुरलीधर एस. पवार हे समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यासह, व्यासपीठावर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा.डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट प्रा.डॉ. सायली गणकर, प्र.कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, मॅनेटचे प्राचार्य कॅप्टन प्रेरित मिश्रा आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.मंगेश कराड यावेळी म्हणाले, भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही. अनेकांनी दिलेल्या बलिदानामुळे आज आपण इथे आहोत. त्यामुळे, आजच्या दिनी स्वातंत्र्यविरांसह देशाच्या प्रगतीत हातभार लावणाऱ्या शेतकरी, कामगार वर्गाचेही स्मरण करायला हवं. अशात विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची मुख्य जबाबदारी ही युवकांच्या खांद्यावर आहे. त्यामुळे, कौशल्याधिष्ठीत युवकांची पिढी घडवून त्यांना देशासमोरील समस्या सोडविण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे, असे आवाहन देखील त्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळ्याने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य आणि देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार 'मॅनेट'च्या कॅडेट्सतर्फे करण्यात आले.

# लोकशाही सदृढतेसाठी विद्यार्थिनींचे योगदान महत्त्वाचे

## डॉ. स्नेहल कनिचे

**सांगली : हॅलो प्रभात**

लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी महाविद्यालयीन विद्यार्थिनींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशाला अधिक बळकट करण्यासाठी तरुण-तरुणींनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाचे एक मत देशाच्या भवितव्यासाठी निर्णायक ठरते. त्यामुळे १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व विद्यार्थिनींनी मतदान नोंदणी करून आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे आवाहन डॉ. स्नेहल कनिचे यांनी केले.




त्यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थिनींनी केवळ स्वतः मतदार नोंदणी न करता आपल्या कुटुंबीय, नातेवाईक व मित्र-मैत्रिणींनाही निवडणुकीचे महत्त्व पटवून देत अभियानात सामील करून घ्यावे. मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाला मिळालेला आहे. त्याचा सुजाणपणे व शंभर टक्के वापर होणे ही काळाची गरज आहे. समाजातील अनेक नागरिक मतदार यादीत नाव नोंदवणे किंवा मतदान करणे या बाबतीत उदासीन असतात, ही प्रवृत्ती बदलली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.ङ्कविशेष मतदार नाव नोंदणी अभियानङ्क या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या अभियानाचे आयोजन श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली विधानसभा मतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या प्रसंगी निवडणूक साक्षरता मंचचे जिल्हा समन्वयक अमन पटेल यांनी विद्यार्थिनींना मतदानाचे महत्त्व समजावून सांगत मतदार नोंदणीबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले. अतुल जाधव यांनी पी.पी.टी. द्वारे नोंदणीची सविस्तर माहिती दिली. तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी अश्विनी वरुटे व निवडणूक नायब तहसिलदार सुषमा लकशेट्टी उपस्थित होत्या. स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ.अनिल सुगते यांनी केले. त्यांनी या अभियानामागील उद्देश स्पष्ट करून मतदार नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला व विद्यार्थिनींना उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. वैशाली जोशी यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. नंदिनी काळे उपस्थित होत्या सूत्रसंचालन प्रा. तन्मयी पुजारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. डी. एस. देशपांडे यांनी मानले.



# सोनहिरा कारखान्यावर स्वातंत्र्य दिन साजरा

**वांगी : हॅलो प्रभात**

डॉ.पतंगराव कदम सोनहिरा कारखाना कार्यस्थळावर ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ध्वजारोहण कारखान्याचे व्हा.चेअरमन दिलीपराव सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना त्यांनी सर्वाना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी कारखाना प्रशासनाच्या वतीने सर्व कर्मचार्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी कारखान्याचे संचालक बापूसो पाटील,पोपटराव महिंद,पंढरीनाथ घाडगे,युवराज कदम,सयाजी धनवडे,जगन्नाथ माळी,कार्यकारी संचालक शरद कदम कारखान्याचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.